सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

**जनसंपर्क अधिकारी**

**पोलीस अधीक्षक कार्यालय, ठाणे ग्रामीण**

एअर मार्शल हेमंत चिटणीस मार्ग, कोर्ट नाका, खारकर आळी, पोलीस स्कुल समोर ठाणे पश्चिम-४००६०१,

E-MAIL ID –lcb.thane.r@mahapolice.gov.in दूरध्वनी क्र. ०२२-२५३४३५६७


---

**प्रेस नोट क्र. १९** **दिनांक :-१५/०४/२०२४**

## आगामी लोकसभा निवडणुकीचे पार्श्वभुमीवर स्थानिक गुन्हे शाखा, ठाणे ग्रामीण यांचेकडुन शहापुर पोलीस ठाणे येथे दाखल गुन्हयांतील पाहीजे आरोपीतांस अटक तसेच टोकावडे पोलीस ठाणे हद्दीत अवैधरित्या सुरु असलेल्या जुगार (पाकोळी) वर करण्यात आली कारवाई

आगामी लोकसभा निवडणुकीचे पार्श्वभुमीवर मा. श्री. डॉ. डी. एस स्वामी, पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण तसेच श्रीमती डॉ. दिपाली घाटे, अपर पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण यांनी ठाणे ग्रामीण जिल्हयातील दाखल गुन्हयातील वेग-वेगळया गुन्हयातील पाहीजे व फरारी आरोपीतांना अटक करणेकामी तसेच अवैध धंद्यावर कारवाई करण्याचे सुचना दिल्या त्यानुसार श्री. सुरेश मनोरे, वरीष्ठ पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा, ठाणे ग्रामीण यांनी ठाणे ग्रामीण जिल्हयातील पाहीजे व फरारी आरोपी तसेच अवैध धंद्या बाबत माहीती मिळवुन कारवाई करणेकामी वेग-वेगळे पथक तयार करुन त्यांना मार्गदर्शन केले.

मा. वरीष्ठांनी दिलेल्या सुचना व आदेशा प्रमाणे स्थानिक गुन्हे शाखा, ठाणे ग्रामीणचे वाशिंद युनिटचे पथकाने गोपनीय माहीती प्राप्त करुन शहापुर पोलीस ठाणे गुन्हा नोंद क्रमांक ५८९/२०१७ भादंविसंक ३२४ या गुन्हयातील पाहीजे आरोपीताला ताब्यात घेवुन पुढील कार्यवाही कामी शहापुर पोलीस ठाण्याचे ताब्यात दिले आहे.

तसेच दिनांक १०/०४/२०२४ रोजी स्थानिक गुन्हे शाखा, ठाणे ग्रामीणचे वाशिंद युनिटचे पथकाने गोपनीय माहीती प्राप्त करुन टोकावडे पोलीस ठाणे हद्दीत मौजे सावरणे गावचे बाहेर रोड लगत सुरु असलेला पाकोळी जुगारावर छापा टाकुन कारवाई करुन पुढील कार्यवाही कामी टोकावडे पोलीस ठाण्याचे ताब्यात दिले आहे.

सदरची कारवाई मा. पोलीस अधीक्षक डॉ. डी. एस स्वामी, श्रीमती डॉ. दिपाली घाटे, अधीक्षक पोलीस अधिक्षक, ठाणे ग्रामीण यांनी दिलेल्या आदेश व सुचना प्रमाणे श्री. सुरेश मनोरे, वरीष्ठ पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा, ठाणे ग्रामीण याचे मार्गदर्शनाखाली उप निरीक्षक/महेश कदम, पोहवा/२४०७ प्रकाश साईल, पोहवा/२५०७ संतोष सुर्वे, पोहवा/२७२३ प्रविण हाबळे, पो.हवा/७७९ सतीष कोळी, पोहवा/२८४२ हेमंत विभुते, पोहवा/७५६ गोविंद कोळी, पोहवा/१०७३ विजय भाईर, पोशि/३२८० स्वप्नील बोडके यांचे पथकाने कौशल्यपुर्ण उल्लेखनिय कामगीरी केलेली आहे.

**********************************************************************